# महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र अंतर्गत दि. १३ ऑक्टोंबर२०२१ रोजी आढावा बैठकीचा इतिवृत्तांत

मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्या अध्यक्षतेखाली महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र अंतर्गत दि. १३ आक्टोंबर २०२१ रोजी आढावा बैठक/व्हीडीओ कॉन्फरन्स संपन्न झाली. सदर बैठकीस उपजिल्हाधिकारी (रोहयो), गट विकास अधिकारी (नरेगा) जि.प.कोल्हापूर, विभागीय वन अधिकारी,सामाजिक वनिकरण,कोल्हापूर, उपवन संरक्षक, वन विभाग, कोल्हापूर, नायब तहसिलदार (रोहयो), रेशीम विकास अधिकारी,कोल्हापूर, सहा.लेखाधिकारी (रोहयो), तहसिलदार, गट विकास अधिकारी, कृषि अधिकारी, वनक्षेत्रपाल, सामाजिक वनिकरण, वन क्षेत्रपाल, वन विभाग, एमआयएस समन्वयक उपस्थित होते.

मा. जिल्हाधिकारी यांनी खालीलप्रमाणे सूचना दिल्या.

| अ. क्र. | विषय | निर्णय | संबंधित विभाग/कार्यालय |
|---|---|---|---|
| १ | शेल्फवरील कामे | सर्व गट विकास अधिकारी / तहसिलदार यांनी ग्रामपंचायत निहाय व यंत्रणानिहाय प्रत्येकी ०५ कामे शेल्फवर राहतील याची खात्री करावी. माहे ऑक्टोबर २०२१ अखेर ज्या तालुकयांचे ०५ कामे शेल्फवर राहणार नाही त्या तालुकयाचे संबंधीत तहसिलदार/गट विकास अधिकारी यांना कारणे दाखवा नोटिस देणेबाबत मा. जिल्हाधिकारी यांनी सूचना दिली. | तहसिलदार/ गट विकास अधिकारी/ सर्व यंत्रणा |
| १ | सन २०२२-२३ चा कृती आराखडा तयार करणे | १) कृती आराखडा तयार करण्यासंदर्भात मा. जिल्हाधिकारी महोदयांनी गेल्या बैठकीत दिलेल्या सूचने नुसार तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक, वन विभाग व सामाजिक वनिकरणांचे तांत्रिक कर्मचारी यांचा सहभागाने शिवार फेरी झाली आहे. उपजिल्हाधिकारी (रोहयो) व उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. यांच्या बैठकाही झाल्या आहेत. सदर शिवार फेरी दरम्यान सुचवलेली कामे गावाच्या गाव नकाशा तसेच पाणलोट नकाशावर चिन्हांकित करणे आवश्यक आहे.<br>३) २० ऑक्टोबर पर्यंत सर्व गावात ग्राम सभा घेणेची कार्यवाही करण्यात यावी. सदर ग्रामसभेत त्यागावचा सन 2022-23 चा कृती आराखडा मंजूर करणे अपेक्षित आहे. | तहसिलदार/ गट विकास अधिकारी/ सर्व यंत्रणा |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ४) ३० ऑक्टोबर पर्यंत गावांचे परिपुर्ण आराखडे संबंधीत गट विकास अधिकारी यांचेकडे दाखल होतील याची खात्री उपमुख्य कार्यकारी अधिकारी (नरेगा कक्ष),जि.प. कोल्हापूर यांनी करावी.<br>६) प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये १०००० ते १५००० कामे आराखडयावर मध्ये समाविष्ट करणेसाठी प्रयत्न करावा. | |
| ३ | ग्रामरोजगार सेवक नियुक्त करणे | २ ऑक्टोबर, च्या ग्रामसभेत ग्रामरोजगार सेवक नियुक्त केले नसतील तर २० ऑक्टोबर पर्यंत होणाऱ्या ग्रामसभेत ग्रामरोजगार सेवक यांची नियुक्ती होईल याची खात्री गट विकास अधिकारी यांनी करावी असे आदेश मा. जिल्हाधिकारी यांनी दिले. | गट विकास अधिकारी |
| ४ | मजूरीचे प्रदान(Timely payment) | १) प्रलंबित हजेरीपत्रकाची यादी दररोज जिल्हयाच्या Whatsapp Group वर रोजगार हमी शाखेतून दिली जावी.<br>२) सदर यादीतील हजेरपत्रकांचे प्रदान हजेरीपत्रक बंद झाल्यानंतर सात (७) दिवसांच्या आतच होईल याची खात्री सर्व संबंधीत यंत्रणाचे प्रमुख यांनी करावी.<br>३) ज्या स्तरावरील विलंबामुळे हजेरीपत्रकाचे प्रदान ७ दिवसाच्या आत होणार नाही त्याच्या दंडाची वसुली संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेकडून केली जाईल.<br>४) ज्यांच्यामुळे हजेरीपत्रकांचे विहित वेळेत प्रदान होणार नाही अशांना दंडाची नोटीस दिली जाईल. असे मा. जिल्हाधिकारी यांनी सांगितले. | गट विकास अधिकारी/ सर्व यंत्रणा |
| ५ | शून्य खर्च असलेली गांवे | ज्या गांवामध्ये मनरेगा अंतर्गत अजूनपर्यंत खर्च झालेला नाही, मनुष्यदिन निर्मिती झालेली नाही अशा सर्व गावामध्ये ३१.१०.२०२१ पर्यंत कामे सुरु करुन मनुष्य निर्मिती करणे अपेक्षीत आहे. याबाबत सर्व गट विकास अधिकारी यांनी आपल्या तालुक्यात अशा गावात प्राधान्याने कामे सुरु करावीत अथवा त्यांना नोटीस देणेत येईल. | गट विकास अधिकारी/ सर्व यंत्रणा |

वरीलप्रमाणे सूचनाअंती बैठकीचा समारोप करण्यात आला.

(प्रशांत खेडेकर)
उपजिल्हाधिकारी (रोहयो)
कोल्हापूर

प्रति,

तहसिलदार/गट विकास अधिकारी/तालुका कृषी अधिकारी/परिक्षेत्र वन अधिकारी/परिक्षेत्र सामाजिक वनिकरण.

प्रत माहितीसाठी :- जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचे स्विय सहाय्यक

प्रत माहितीसाठी :-

१) जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, कोल्हापूरउप संचालक, सामाजिक वनिकरण, कोल्हापूर

२) उपवन संरक्षक, वन विभाग, कोल्हापूर